भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA (बँक ऑफ बडोदा) 2024

CU 902442

विक्री ठिकाण :- दत्त चौक, सिडको, नविन नाशिक नाशिक

अ.नं. 6101 दि. 20 JAN 2025 रु 1000/- पैकी रु. 500/-

स्टॅम्प घेणाऱ्याचे नांव राकेश रतन चौधरी

रा. प्लॉट नं-५ श्रीकला

हाईट्स इंदिरानगर नाशिक

मुद्रांक घेण्याचे कारण बँक कर्ज कामी

सही (सही)

श्री नानाजी यु.शिरसाट
स्टॅम्प वेंडर
दत्त चौक, सिडको, नाशिक
परवाना क्र १६/२००२

TREASURY OFFICE NASIK
13 JAN 2025
STPHC ATO

NOTARY PRERANA P. DESHPANDE NASHIK DIST. AREA (MAHARASHTRA) REG. NO. 4566 GOVT. OF INDIA
NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

# साठेखत करारनामा

साठेखत करारनामा आज दिनांक २१ माहे जानेवारी इसवी सन २०२५ रोज मंगळवार ते दिवशी नाशिक मुक्कामी . . . .

| | |
|---|---|
| Noted & Registered at Serial Number : | 39 |
| Date : | 21/1/2025 |
| Pages Contain : | 12 |

Scanned with CamScanner

NOTARY
PRERANA R. DESHPANDE
NASHIK DIST. AREA
(MAHARASHTRA)
REGN. NO. 4566
GOVT. OF INDIA

| | |
|---|---|
| **१) श्री.सनेर प्रमोद दिलीप**<br>उ.व.- २९, धंदा - व्यापार,<br>पॅनकार्ड नं.-एच एम क्यू पी एस ५९९४ क्यू<br>आधारकार्ड नं.- ८८७७ ७२१६ ६९१३<br>**२) सौ. अलकाबाई दिलीप पाटील**<br>उ.व.- ५६, धंदा - गृहीणी,<br>पॅनकार्ड नं.-आय ओ क्यू पी पी ९७२६ ए<br>आधारकार्ड नं.-५२८३ ३६७५ ४६६६<br>दोघे रा.- भालेर, नंदुरबार -४२५४१२.<br>आज मुक्काम -नाशिक. | लिहुन घेणार |

**- : यांसी : -**

| | |
|---|---|
| **१) श्री. नितीन आत्माराम महाजन**<br>उ.व.- ४४, धंदा - व्यापार,<br>रा.-घर नंबर-एन-५३/एस.एफ-५/८/६,<br>अंबड लिंक रोड, बुरकुले हॉल समोर,<br>उत्तमनगर, नाशिक-४२२००८.<br>पॅनकार्ड नं.-ए यु क्यू पी एम ४८३३ के<br>आधारकार्ड नं.- ४५९५ २८६८ २५६१<br>**२) श्री. राकेश रतन चौधरी**<br>उ.व.- ४०, धंदा - व्यापार,<br>रा.-फ्लॅट नंबर-४, श्री.कला हाईट्स,<br>प्लॉट नं.५४, सर्व्हे नं.८८९/५/१/५/५४,<br>वडाळा-पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक-४२२००९.<br>पॅनकार्ड नं.-ए एच के पी सी ०३९५ एफ<br>आधारकार्ड नं.- ८८५२ २५६१ ०९९१<br>**३) सौ. संगीता अनिल वझीरानी**<br>उ.व.- ५३, धंदा - गृहीणी व व्यापार,<br>रा.-फ्लॅट नंबर-१५-ए, मधुबन अपार्टमेंट,<br>आनंदवल्ली, गंगापुर रोड, नाशिक-४२२०१३.<br>पॅनकार्ड नं.-ए एल एम पी व्ही ४४३९ के<br>आधारकार्ड नं.-६२६२ ७१९१ २८८३<br>**४) श्री.योगेश भिकनराव सांळुखे**<br>उ.व.- ४५, धंदा - व्यापार,<br>रा.-घर नंबर-एन-५३/ए.जे.-१/५/५,<br>राम मंदिराजवळ, राजरत्न नगर, उत्तम नगर,<br>सिडको, नाशिक -४२२००९.<br>पॅनकार्ड नं.-ए व्ही एन पी एस ७८०१ एच<br>आधारकार्ड नं.-३२३८ ७३७५ ५४१० | लिहून देणार |

Scanned with CamScanner

५) **श्री. जगदीश यशवंत पाटील**
उ.व.- ४४, धंदा - व्यापार,
रा.-मु.पो.शिंदखेडा, ता.शिंदखेडा,
जि.धुळे-४२५४०६,आज मुक्काम -नाशिक.
पॅनकार्ड नं.-ए ओ एक्स पी पी ४७३८ बी
आधारकार्ड नं.-२७४१ १०७६ ६७३८

लिहून देणार

**- : आणि : -**

१) **श्री. नितीन आत्माराम महाजन**
उ.व.- ४४, धंदा - व्यापार,
रा.-घर नंबर-एन-५३/एस.एफ-५/८/६,
अंबड लिंक रोड,बुरकुले हॉल समोर,
उत्तमनगर,नाशिक-४२२००८.
पॅनकार्ड नं.-ए यु क्यू पी एम ४८३३ के
आधारकार्ड नं.- ४५९५ २८६८ २५६१

२) **श्री. राकेश रतन चौधरी**
उ.व.- ४०, धंदा - व्यापार,
रा.-फ्लॅट नंबर-४,श्री.कला हाईट्स,
प्लॉट नं.५४,सर्व्हे नं.८८९/५/१/५/५४,
वडाळा-पाथर्डी रोड,इंदिरानगर,नाशिक-४२२००९.
पॅनकार्ड नं.-ए एच के पी सी ०३९५ एफ
आधारकार्ड नं.- ८८५२ २५६१ ०९९१

३) **सौ. संगीता अनिल वझीरानी**
उ.व.- ५३, धंदा - गृहीणी व व्यापार,
रा.-फ्लॅट नंबर-१५-ए,मधुबन अपार्टमेंट,
आनंदवल्ली,गंगापुर रोड,नाशिक-४२२०१३.
पॅनकार्ड नं.-ए एल एम पी व्ही ४४३९ के
आधारकार्ड नं.-६२६२ ७१९१ २८८३

४) **श्री.योगेश भिकनराव सांळुखे**
उ.व.- ४५, धंदा - व्यापार,
रा.-घर नंबर-एन-५३/ए.जे.-१/५/५,
राम मंदिराजवळ,राजरत्न नगर,उत्तम नगर,
सिडको, नाशिक -४२२००९.
पॅनकार्ड नं.-ए व्ही एन पी एस ७८०१ एच
आधारकार्ड नं.-३२३८ ७३७५ ५४१०

५) **श्री. जगदीश यशवंत पाटील**
उ.व.- ४४, धंदा - व्यापार,

संमती देणार

Scanned with CamScanner

NOTARY
PRERANA P. DESHPANDE
NASHIK DIST. AREA
(MAHARASHTRA)
REGN. NO. 4566
GOVT. OF INDIA

| | |
|---|---|
| रा.-मु.पो.शिंदखेडा, ता.शिंदखेडा,<br>जि.धुळे-४२५४०६,आज मुक्काम -नाशिक.<br>पॅनकार्ड नं.-ए ओ एक्स पी पी ४७३८ बी<br>आधारकार्ड नं.-२७४१ १०७६ ६७३८<br>**यांचे तर्फे विकसन करणार व**<br>**जनरल मुखत्यार म्हणून-**<br>**श्री वैष्णवी बिल्डकॉन,भागीदारी संस्था,**<br>पॅनकार्ड नं.- ए ई टी एफ एस ७३२२ ई<br>**तर्फे भागीदार-**<br>**१) श्री.रविंद्र परशराम गांगुर्डे**<br>उ.व.- ४२, धंदा - व्यापार,<br>रा.-फ्लॅट नंबर-४,अर्निक अपार्टमेंट,<br>प्लॉट नंबर-६,सर्व्हे नं-२०/३/३,स्ट्रॉबेरी<br>शाळेजवळ,पाथर्डी फाटा,नाशिक-४२२०१०.<br>पॅनकार्ड नं.-ए एल ई पी जी ०२३२ एच<br>आधारकार्ड नं.- २२३७ ०८५५ २३९४<br>**२) श्री. छोटुकुमार नागनारायण चौहाण**<br>उ.व.- ४५, धंदा - व्यापार,<br>रा.-फ्लॅट नंबर-८,यशलक्ष्मी विला,<br>जयभवानी रोड,लोणकर मळा,नाशिक-४२२१०१.<br>पॅनकार्ड नं.-ए आय एम पी सी २४४५ डी<br>आधारकार्ड नं.-६४१४ १२०५ १२७१<br>**३) श्री. सुमित किसन गांगुर्डे**<br>उ.व.- ३१, धंदा - व्यापार,<br>रा.-प्लॉट नंबर-४४,सर्व्हे नंबर-१०२/१,<br>मधूशाम बंगला,पाथर्डी रोड,गुरुगोविंद सिंग<br>कॉलेज जवळ,इंदिरा नगर,नाशिक-४२२००९.<br>पॅनकार्ड नं.-ए पी वाय पी जी १८२९ सी<br>आधारकार्ड नं.-४४२५ २८९८ ६४२१<br>**४) श्री. ज्ञानेश्वर विष्णु बच्छाव**<br>उ.व.- ५०, धंदा - व्यापार,<br>रा.-घर नंबर-१०९०,व्यंकटराव हिरे नगर,<br>सटाणा नाका,सोयगांव, ता.मालेगांव,<br>जि.नाशिक -४२३२०३.<br>पॅनकार्ड नं.-ए जे एक्स पी बी ८३३४ क्यू<br>आधारकार्ड नं.-३३१० ८०८६ ६६१३ | **संमती देणार** |

**कारणे करारनामा लिहून देतात तो ऐसा जे की,**

सदरचे दस्तात संक्षिप्ततेसाठी लिहून घेणार यांचा उल्लेख **तुम्ही/तुमचे**, लिहून देणार यांचा उल्लेख **आम्ही/आमचे**, संमती देणार यांचा उल्लेख **संमती देणार** व या दस्ताचा विषय असलेल्या

Scanned with CamScanner

फ्लॅट मिळकतीचा उल्लेख **सदर मिळकत** असा करण्यात आलेला असून यामध्ये उभयतांचे वालीवारस, भागीदारीतील भागीदार,त्यांचे कुटूंबीय,प्रतिनिधी,मुखत्यार व त्यांचे तर्फे हक्क सांगणारे हरएक घटकाचा समावेश आहे व राहील.

१) मिळकतीचे वर्णन : -

(अ) तुकडी जिल्हा नाशिक,पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, **मौजे पाथर्डी-२** या गांवचे शिवारातील सर्व्हे नंबर-२३९/१३ पैकी मंजूर ले आऊटमधील बिनशेती प्लॉट नंबर-२८, यांसी एकुण क्षेत्र ३३४.८० चौ.मी., यांसी आकार रु.९७.०९ पैसे, यांसी सिटी सर्व्हे नंबर-१८२४,सिटी सर्व्हेप्रमाणे क्षेत्र ३२७.९०चौ.मी., यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे : -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | ९.०० मीटर रंदीचा कॉलनी रोड |
| पश्चिमेस | : | लागू सर्व्हे नंबर-२३९/२/१/१ |
| दक्षिणेस | : | प्लॉट नंबर-२९ |
| उत्तरेस | : | प्लॉट नंबर-२७ |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकत, जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप व तदंगभुत वस्तुंसहीत तसेच मिळकतीमध्ये जाण्या-येण्याचे वागवहिवाटीचे मार्गाचे व कॉलनी रोड वापरण्याचे मालकी हक्कासहची प्लॉट मिळकत दरोबस्त.

(ब) कलम१-अ या प्लॉट मिळकतींवर **'वैष्णवी अपार्टमेंट'** या नावाने बाधलेल्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील **फ्लॅट नंबर-२०१(दोनशे एक), (विकसन करारनाम्यानुसार फ्लॅट नंबर-५)**, यांसी कार्पेट क्षेत्र ३२२.५८ चौ.फुट म्हणजेच २९.९८ चौ. मी. + बाल्कनीचे क्षेत्र ३८.७३ चौ.फुट म्हणजेच ३.६० चौ.मी.,यामध्ये हॉल,किचन,एक बेडरुम,टॉयलेट,बाल्कनी इत्यादी व सदर इमारतीचे घोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त फ्लॅट मिळकतीस सदर अपार्टमेंटमध्ये ४.८१ % इतका मालकी हक्क व मतदानाचा हक्क असलेली फ्लॅट मिळकत, असलेली फ्लॅट मिळकत, यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे : -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | लॉबी,बिल्डींगचा जिना व फ्लॅट नंबर-२०४ |
| पश्चिमेस | : | साईड मार्जीनल स्पेस |
| दक्षिणेस | : | साईड मार्जीनल स्पेस |
| उत्तरेस | : | फ्लॅट नंबर-२०२ |

येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक फ्लॅट मिळकत, त्यात जाण्यायेण्याचे, वागवहिवाटीचे हक्कांसह तसेच सदर मिळकतीमध्ये असलेल्या सुखसुविधांचा वापर करण्याचे हक्कांसहची फ्लॅट मिळकत दरोबस्त.

२) वर कलम १अ यांत वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही लिहून देणार,श्री.नितीन आत्माराम महाजन व इतर ४ यांचे खरेदी मालकीची असुन त्यांचे कब्जे, वहीवाटीतील व उपभोगातील आहेत.सदरची प्लॉट मिळकत लिहून देणार यांनी श्री. प्रभाकर पुंडलिक येवले व सौ. रेखा प्रभाकर येवले यांचेकडून दिनांक २७/०३/२०२३ रोजी "कायम फरोक्त खरेदीखत" या दस्तान्वये घेतलेली आहे.

NOTARY PRERANA P. DESHPANDE NASHIK DIST. AREA (MAHARASHTRA) REGN. NO. 4565 GOVT. OF INDIA

Scanned with CamScanner

सदरचा दस्त मे.सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग२,नाशिक-७ यांचे कार्यालयात दस्त क्र.-३५२५/२०२३ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर प्लॉट मिळकतीच्या रेकॉर्डला लिहुन देणार,श्री. नितीन आत्माराम महाजन व इतर ४ यांची नांवे नोंद क्र.-३२२४८ अन्वये लागलेली आहेत.तेव्हापासुन उपरोक्त प्लॉट मिळकत ही लिहुन देणार यांचे कब्जे, उपभोगात व वहिवाटीत आहे व लिहुन देणार यांना उपरोक्त प्लॉट मिळकतीचे पाहिजे तसे विकसन,विक्री अथवा विल्हेवाट लावण्याचे संपुर्ण हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत.

तसेच लिहून देणार,श्री. नितीन आत्माराम महाजन व इतर ४ यांना उपरोक्त प्लॉट मिळकत विकसित करावयाची असल्याने त्यांनी प्राप्त हक्क व अधिकारात सदर प्लॉट मिळकत संमती देणार/बिल्डर,डेव्हलपर,श्री.वैष्णवी बिल्डकॉन,भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री.रविंद्र परशराम गांगुर्डे व इतर ३ यांना विकसित करण्यास देण्याचे निश्चित करुन सदरच्या प्लॉट मिळकतीबाबत संमती देणार/बिल्डर,डेव्हलपर यांचे लाभात दिनांक २५/०४/२०२३ रोजी विकसन करारनामा लिहून दिलेला असून सदरचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग २, नाशिक-४ यांचे कार्यालयात दस्त क्र.-४७७७/२०२३ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.सदरचे विकसन करारनाम्यास अनुसरुन दिनांक २५/०४/२०२३ रोजी जनरल मुखत्यार पत्र लिहून दिलेले असून सदरचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग २, नाशिक-४ यांचे कार्यालयात दस्त क्र.-४७७८/२०२३ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.येणेप्रमाणे संमती देणार/बिल्डर, डेव्हलपर यांना वर कलम १अ यांत वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही पाहीजे तशी विकसित करण्याचे पुर्ण हक्क व अधिकार आहेत.उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दिनांक २५/०४/२०२३ रोजीचे विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्रानुसार संमती देणार यांनी लिहून देणार यांना मोबदला म्हणून वर कलम१अ यांत वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील बांधीव फ्लॅटस मिळकती देण्याचे निश्चित केलेले आहे.सदरचे दस्तानुसार विकसनापोटी बांधीव मोबदला म्हणून प्लॉट मालक,श्री. नितीन आत्माराम महाजन,श्री. राकेश रतन चौधरी,सौ. संगीता अनिल वझीरानी,श्री. योगेश भिकनराव साळुंखे व श्री. जगदीश यशवंत पाटील यांना दुसऱ्या मजल्यावरील चार फ्लॅट मिळकती व चौथ्या मजल्यावरील चार फ्लॅट मिळकती असे देण्यात आलेले आहे. त्यानुसार वर कलम १ब यांत वर्णन केलेली व या दस्ताचा विषय असलेली फ्लॅट नंबर-२०१ ही मिळकत लिहून देणार यांना विकसनाचे मोबदल्यापोटी देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे लिहून देणार यांना सदर मिळकतीबाबत संपुर्ण हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदरचे हक्क व अधिकारात वर कलम १ब यांत वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही लिहून देणार यांनी विक्रीस काढली,ही गोष्ट लिहून घेणार यांना समजली व लिहून घेणार यांनाही सदर फ्लॅट मिळकत घ्यावयाची होती. म्हणून लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान बोलणी बैठका होऊन व्यवहार निश्चित करण्यात आला.तसेच संमती देणार ही श्री.वैष्णवी बिल्डकॉन या नावाची भागीदारी संस्था असून सदर भागीदारीमध्ये संमती देणार हे चार भागीदार आहेत. तसेच सदर व्यवहाराच्या अटी व शर्ती रेकॉर्ड करणेकामी लिहून देणार हे संमती देणार/डेव्हलपर यांचे संमतीने सदरचा करारनामा आज रोजी लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवून देत आहेत. तसेच संमती देणार/बिल्डर, डेव्हलपर या सर्वांना दस्तऐवज नोंदणी करणेकामी वेळोवेळी येणे अशक्य असल्याने त्यांनी त्यांचेपैकी श्री.छोटुकुमार नागनारायण चौहाण व श्री.सुमित किसन गांगुर्डे यांचे लाभात दोन वेगवेगळे विशेष मुखत्यारपत्र हे दिनांक २५/०४/२०२३ रोजी लिहून दिलेले असून सदरचे दोन्ही दस्तऐवज हे सह दुय्यम निबंधक साहेब,वर्ग२,नाशिक-४ यांचे कार्यालयात अनुक्रमे दस्तऐवज क्र.- ४७७९/२०२३ व ४७८०/२०२३ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेले आहेत.तसेच संमती देणार/बिल्डर, डेव्हलपर या सर्वांना दस्तऐवज नोंदणी करणेकामी वेळोवेळी येणे अशक्य असल्याने त्यांनी त्यांचेपैकी श्री.योगेश भिकनराव साळुंखे यांचे लाभात विशेष मुखत्यारपत्र हे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी लिहून दिलेले

Scanned with CamScanner

असून सदरचे दोन्ही दस्तऐवज हे सह दुय्यम निबंधक साहेब,वर्ग२,नाशिक-७ यांचे कार्यालयात दस्तऐवज क्र.- ८६३०/२०२४ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेले आहेत.सदरचे तीनही विशेष मुखत्यारपत्र हे आजही अस्तित्वात असून त्यांचा अंमल कायम आहे. त्यास अनुसरुन सदरचा दस्त लिहून देणार यांनी संमती देणार यांचे संमतीने लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवून दिलेला आहे.

३) <u>सदर फ्लॅट मिळकतीबाबत तुमचे व आमचे दरम्यान बोलणी होवून व्यवहाराच्या अटी व शर्ती ठरलेल्या आहेत, त्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u> : -

१. उपरोक्त कलम १ब यांत वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीची तुमचे व आमचे दरम्यान उक्ती मोबदला रक्कम रु.१७,००,०००/-(अक्षरी रुपये सतरा लाख मात्र) इतकी ठरली असून सदरची किंमत आजचे प्रचलित बाजार भावाने योग्य व बरोबर आहे.सदर किंमतीविषयी उभयतांची तक्रार नाही.

२. वर कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा प्रत्यक्ष,निर्वेध व खुला कब्जा आम्ही, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना आजपासून २(दोन) महीने या मुदतीत मोबदल्याची संपुर्ण रक्कम स्विकारुन दयावयाचा आहे. सदरचा कब्जा घेतेवेळी लिहून घेणार यांनी उपरोक्त फ्लॅट मिळकतीची पाहणी व तपासणी करुन घ्यावयाची आहे. सदरची बाब लिहून घेणार यांनी मान्य व कबूल केलेली आहे.

३. सदरील मिळकतीचे डीड ऑफ अपार्टमेंट अगर अंतिम हस्तांतरणाचा आवश्यक तो दस्तऐवज तुमचे नांवाने व सांगाल त्यावेळी आम्ही,लिहून देणार समक्ष हजर राहून लिहून व नोंदवून देऊ, त्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण करणार नाही.

४. वर कलम १ब यात नमुद केलेल्या फ्लॅट मिळकतीचे प्रत्यक्ष जागेची, बांधकामाचे दर्जाची व तसेच कलम १अ यात नमुद केलेल्या मिळकतीवरील बांधकामासंदर्भातील सर्व कागदपत्रांची लिहुन घेणार यांनी पाहणी व तपासणी केलेली आहे आणि सर्व बाबी लिहून घेणार यांना मान्य व कबूल आहेत.

५. प्रस्तुतच्या साठेखत करारनाम्यान्वये लिहून दिलेली मिळकत ही तुम्हांस कायम खरेदी देण्याचे ठरविले आहे. तसेच सदर फ्लॅट मिळकत कोणत्याही कारणाने उलट खरेदीने अथवा करारनाम्याने परत दयावयाची नाही.

६. वर कलम १ब यांत वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. सदर मिळकत आम्ही, लिहून देणार यांनी कोठेही गहाण, दान,लिन, लिज, अन्नवस्त्र, अगर जप्ती, जामिनकी, तोंडी वा लेखी बोलीने विक्री केलेली नाही, तसेच कराररमदार, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, मृत्युपत्रान्वये हस्तांतर केलेली नाही. मिळकतीं बाबत कुठल्याही कोर्टात वाद लवाद चालू नाही सदर मिळकत ॲक्वायर अगर रिक्वीझीशन झालेली नसून त्याबाबत आम्हांला निमसरकारी अगर स्थानिक सरकार कडून नोटीस लागलेली नाही व सदर मिळकतीतून कोणासही जाणेयेण्याचा, पाणी नेणे आणण्याचा इजमेंटचा हक्क नाही.अशा प्रकारे मिळकत निर्वेध आहे.

७. वर कलम १ब यात नमुद केलेल्या फ्लॅट मिळकतीचा ताबा मिळाल्यापासुन महानगर पालिकेची घरपट्टी व इतर टॅक्सेस, महावितरण यांचे विज मीटरचे बिल, बिल्डींग मेंटेनन्स, हिस्सेराशीनुसार एन.ए.टॅक्स इत्यादी आकारुन आलेल्या रकमा दरमहा/दरवर्षी वेळचेवेळी भरावयाच्या आहेत, ती जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील.

Scanned with CamScanner

८. वर कलम १ब यांत वर्णन केलेली फ्लॅटची उभयतांमध्ये उक्ती किंमत ठरविण्यात आलेली आहे.तसेच उपरोक्त फ्लॅट मिळकतीकामी लागणारी लाईट मीटर व कॉमन पाणी मीटर डिपॉझिटची रक्कम मोबदला रकमेमध्ये समाविष्ट असून सदर रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मोबदला रकमेव्यतिरिक्त वेगळी दयावयाची नाही.तसेच लिहून देणार व संमती देणार हे जशा पध्दतीने बिल्डींग मेन्टेनन्स घेण्याचे निश्चित करतील त्या पध्दतीने लिहून घेणार यांनी त्यांचे हिश्याची बिल्डींग मेन्टेनन्सची रक्कम मागणी करताच लिहून देणार यांना दयावयाची आहे.त्याचेशी लिहून देणार व संमती देणार यांचा कोणताही संबंध राहणार नाही. सदरची बाब लिहून घेणार यांनी मान्य व कबूल केलेली आहे.

९. सदर मिळकतीची मोबदला म्हणून उभयतांमध्ये उक्ती किंमत रक्कम रु.१७,००,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख मात्र) अशी ठरली असुन सदरची मोबदला रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कशी दिली, त्याचा भरणा तपशिल खालीलप्रमाणे : -

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| रु.३४,०००/- | अक्षरी रुपये चौतीस हजार मात्र इतकी रक्कम दिनांक १७/०१/२०२५ रोजी लिहुन घेणार यांनी त्यांचे बँक खात्यामधून लिहून देणार नंबर-१यांचे बँक खात्यात पेटीएम सेवेव्दारे रक्कम ट्रान्सफर केली.त्याचा युटीआर नंबर-५०१७४१२३९७६४ असा आहे.येणे प्रमाणे रक्कम लिहून घेणार यांनी देणार नंबर-१,श्री. नितीन आत्माराम महाजन यांना दिली ती मिळाली, भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही. |
| रु.३४,०००/- | अक्षरी रुपये चौतीस हजार मात्र इतकी रक्कम दिनांक १७/०१/२०२५ रोजी लिहुन घेणार यांनी त्यांचे बँक खात्यामधून लिहून देणार नंबर-२यांचे बँक खात्यात पेटीएम सेवेव्दारे रक्कम ट्रान्सफर केली.त्याचा युटीआर नंबर-५०१७६९१७४१४२ असा आहे.येणे प्रमाणे रक्कम लिहून घेणार यांनी देणार नंबर-२,श्री. राकेश रतन चौधरी यांना दिली ती मिळाली,भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही. |
| रु.३४,०००/- | अक्षरी रुपये चौतीस हजार मात्र इतकी रक्कम दिनांक १७/०१/२०२५ रोजी लिहुन घेणार यांनी त्यांचे बँक खात्यामधून लिहून देणार नंबर-३यांचे बँक खात्यात पेटीएम सेवेव्दारे रक्कम ट्रान्सफर केली.त्याचा युटीआर नंबर-५०१७४०९२०५२१ असा आहे.येणे प्रमाणे रक्कम लिहून घेणार यांनी देणार नंबर-३,सौ.संगिता अनिल वझिराणी यांना दिली ती मिळाली, भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही. |
| रु.३४,०००/- | अक्षरी रुपये चौतीस हजार मात्र इतकी रक्कम दिनांक १७/०१/२०२५ रोजी लिहुन घेणार यांनी त्यांचे बँक खात्यामधून लिहून देणार नंबर-४यांचे बँक खात्यात पेटीएम सेवेव्दारे रक्कम ट्रान्सफर केली.त्याचा युटीआर नंबर-५०१८३०५८७३७२ असा आहे.येणे प्रमाणे रक्कम लिहून घेणार यांनी देणार नंबर-४,श्री.योगेश भिकनराव साळुंखे यांना दिली ती मिळाली, भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही. |

NOTARY

Scanned with CamScanner

रु.३४,०००/- अक्षरी रुपये चौतीस हजार मात्र इतकी रक्कम दिनांक १८/०१/२०२५ रोजी लिहुन घेणार यांनी त्यांचे बँक खात्यामधून लिहून देणार नंबर-५यांचे बँक खात्यात पेटीएम सेवेव्दारे रक्कम ट्रान्सफर केली.त्याचा युटीआर नंबर-५०१८६०५९९२२६ असा आहे.येणे प्रमाणे रक्कम लिहून घेणार यांनी देणार नंबर-५,श्री.जगदीश यशवंत पाटील यांना दिली ती मिळाली, भरण्याबाबत काहीएक तक्रार नाही.

रु.१५,३०,०००/- अक्षरी रुपये पंधरा लाख तीस हजार मात्र इतकी रक्कम आजपासून २(दोन) महीने या मुदतीत लिहून घेणार यांनी कोणत्याही बँक अथवा वित्तीय संस्था यांचेकडून कर्ज स्वरुपात घेऊन अगर स्वत:चे जबाबदारीवर सदरची रक्कम लिहून देणार यांना दयावयाची आहे व सदरचा व्यवहार पुर्ण करणेचा आहे.

---

रु.१७,००,०००/- एकूण अक्षरी रुपये सतरा लाख मात्र

---

येणेप्रमाणे वर भरण्याचे तपशिलात वर्णन केल्याप्रमाणे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मोबदल्याची रक्कम दयावयाची आहे.

१०. सदर मिळकतीसंबंधाने जे जे हक्क व अधिकार आम्हाला प्राप्त झालेले होते.ते ते सर्व हक्क व अधिकार तुम्हांस कायमस्वरुपी आवश्यक त्या अंतिम हस्तांतरणाचे दस्तऐवजाने हस्तांतरीत करण्यात येतील, याची जाण लिहून देणार यांस आहे.

११. प्रस्तुत कराराचा संपुर्ण खर्च लिहून देणार यांनी केलेला असून सोसलेला आहे. तसेच डीड ऑफ अपार्टमेंटचा येणारा संपुर्ण खर्च जसे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी, टायपिंग, झेरॉक्स इत्यादी आवश्यक तो खर्च हा लिहून देणार यांनीच करावयाचा आहे.

## : : सुविधांचे परिशिष्ट : :

१. इमारतीचे बांधकाम आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चरमध्ये, बाहेरील भिंती ६" व आतील ४" विट बांधकाम, आतून नेरु प्लॅस्टर व बाहेरुन सिमेंट प्लॅस्टर

२. किचन रुम मध्ये स्वयंपाकासाठी कडप्पा किचन ओटा,ओटयालगत पाण्याचे सिंक, किचनमध्ये अडीच इलेक्ट्रीक पॉईन्ट.

३. बेडरुम व लिव्हींग रुममध्ये इलेक्ट्रीकचे ३ पॉईन्ट व केसींग कॅपींग इलेक्ट्रीक फिटींग

४. टॉयलेटजवळ असलेल्या पॅसेजमध्ये एक वॉशबेसीन

५. बाल्कनी मध्ये एक स्वतंत्र इलेक्ट्रीक पॉईन्ट

६. फ्लॅट मधील प्रत्येक रुमच्या दरवाजांना मार्बल फ्रेमस, फ्लश डोअर/ पी.व्ही.सी. दरवाजे व मजबूत लोखंडी ग्रील असलेल्या खिडक्या

७. खिडक्यांना टू ट्रॅक स्लायडींग विंडोज

८. लिव्हींग रुम, बेडरुम व किचनमध्ये साध्या टाईल्स

९. संपूर्ण फ्लॅटमध्ये कलरवॉश, खिडक्या व दरवाजे यांना ऑईल पेंट

१०. लिफ्ट विथ बॅटरी बॅकअप.


Scanned with CamScanner

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदरचे फ्लॅटमध्ये लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सुखसुविधा दिलेल्या आहेत. त्याकामी उभयतांमध्ये काहीएक तक्रार नाही.


येणेप्रमाणे हा साठेखत करारनामा आज रोजी आम्ही, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात राजीखुशीने व स्वसंतोषाने, कोणाचेही धाक, दबाव व प्रभाव यांस बळी न पडता, कोणत्याही प्रकारे नशा पाणी न करता, उत्तम मनस्थितीत लिहून, विचारपुर्वक वाचून व समजावून घेऊन तसेच सदर दस्त बरोबर असल्याचे मान्य व कबूल करुन दोन साक्षीदारांसमक्ष आमच्या सहया करुन लिहून दिला असे, हा साठेखत करारनामा.

नाशिक :


दिनांक : २१/०१/२०२५



१) श्री. नितीन आत्माराम महाजन



२) श्री. राकेश रतन चौधरी



३) सौ. संगीता अनिल वझीरानी



४) श्री.योगेश भिकनराव सांळुखे

Scanned with CamScanner

५) श्री. जगदीश यशवंत पाटील

(लिहून देणार)



१) श्री. नितीन आत्माराम महाजन
२) श्री. राकेश रतन चौधरी
३) सौ. संगीता अनिल वझीरानी
४) श्री.योगेश भिकनराव सांळुखे
५) श्री. जगदीश यशवंत पाटील
यांचे तर्फे विकसन करणार व जनरल मुखत्यार म्हणून-श्री वैष्णवी बिल्डकॉन, भागीदारी संस्था, तर्फे भागीदार-
१) श्री.रविंद्र परशराम गांगुर्डे



२) श्री. छोटुकुमार नागनारायण चौहाण



३) श्री. सुमित किसन गांगुर्डे



४) श्री. ज्ञानेश्वर विष्णु बच्छाव

(संमती देणार)



Scanned with CamScanner



१) श्री. सनेर प्रमोद दिलीप



अलकाबाई दिलीप पा.

२) सौ. अलकाबाई दिलीप पाटील

(लिहून घेणार)

साक्षीदार : -

१) शिवाजी आमले

२) प्रशांत गायकवाड

BEFORE ME

Sau. PRERANA P. DESHPANDE
Advocate & Notary, Govt. of India
Off.: Chamber No. 202, B, No.2,
Dist.Court, Nashik.
Res : 5, Nirmalaa Appt., Racca Colony,
Nashik